





## तापी माई शेतकरी उत्पादक कंपनीचा खपली गहू उत्पादनाचा उपक्रम कौतुकास्पद



धुळे (प्रतिनिधी) :- दि.५/४/२०२५ तापी माई शेतकरी उत्पादक कंपनी, दाऊळ तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे ,यांनी रब्बी हंगामात खपली गावाची पेरणी करून उत्तम पद्धतीने खपली गहू उत्पादित केलेला आहे यासाठी त्यांनी आपल्या सदस्यांना २० किलो बियाणे प्रति एकर साठी दिले होते त्याप्रमाणे त्यांनी आपल्या सदस्यांकडून खपली गावाचे उत्पादन करून घेतले साधारणत जास्तीत जास्त २० क्विंटल प्रति एकर तर काही सदस्यांना १२ क्विंटल प्रति एकर याप्रमाणे खपली गव्हाचे उत्पादन झालेले आहे. २२ जानेवारी २०२५ रोजी स्मार्ट प्रकल्पाच्या माध्यमातून खरेदीदार विक्रेते संमेलन, गणपती पॅलेस, मालेगाव रोड ,धुळे येथे घेण्यात आले होती त्याप्रसंगी २ ब्रदर्स ऑरगॅनिक इंदापूर ,या कंपनी चा तापीमाई शेतकरी उत्पादक कंपनी शी खपली गहू संदर्भात करारनामा करण्यात आला होता. त्या अनुषंगाने आज पहिल्या टप्प्यातील खपली गहू ३५ टन मा. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धुळे,सुरज जगताप, प्रकल्प संचालक, आत्मा, धुळे ,हितेंद्र सोनवणे व स्मार्ट चे नोडल अधिकारी विनय बोरसे यांचे प्रमुख उपस्थितीत वजन काट्याची ची पूजा करून खपली गव्हाची पहिल्या गाडी साठी हिरवा झेंडा दाखवण्यात येऊन कव्हर न काढलेला खपली गहू रुपये ४००० प्रतिक्विंटल दराने इंदापूर येथील २ ब्रदर्स ऑरगॅनिक इंदापूर ,या कंपनीने खरेदी केलेला आहे. तापीमाई शेतकरी उत्पादक कंपनीचा २०० टन खपली गहू करार पद्धतीने खरेदी करून इंदापूर येथे पाठवण्यात येणार आहे. या प्रसंगी तापीमाई फार्मर्स प्रोड्यूसर्स कंपनीचे अध्यक्ष नरेंद्र भामरे यांनी कंपनीची वाटचाल व स्मार्ट प्रकल्पामध्ये मिळालेली मंजुरी ,कर्ज मंजुरी व (पान ४ वर)

### खपली गहू उत्पादनाचा उपक्रम

अनुदान मागणी याबाबतची माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रम प्रसंगी तापीमाई शेतकरी उत्पादक कंपनीचे सन्माननीय सदस्य ,संचालक मंडळ,टू ब्रदर्स कंपनीचे अधिकारी स्वप्निल तायडे, लुपिन फाउंडेशन चे अधिकारी तसेच सेवानिवृत्त झोनल मॅनेजर, रवींद्र वाघ प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व प्रकल्प संचालक आत्मा यांनी कंपनीच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व अवर्षण प्रवण भागामध्ये उत्तम पद्धतीने कंपनीच्या कामकाजाची वाटचाल सुरू असले बाबत कौतुकाची थाप दिली. याप्रसंगी देगावचे प्रताप दादा , तावखेड्याचे हितेंद्र दादा, कंपनीचे शिवराज भामरे ,तसेच प्रशांत दादा, तालुका कृषी अधिकारी नागरे, मंडळ कृषी अधिकारी, अक्षय गावंडे प्रामुख्याने उपस्थित होते.प्रगतीशील शेतकरी गोपाल पाटील,पोलिस पाटील मंदाणे यांनी खपली गहू प्रति एकर २० क्विंटल उत्पादन काढले आहे. कार्यक्रम प्रसंगी त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# देशोन्नती

## तापीमाई उत्पादक शेतकरी कंपनीकडून गहू खरेदीस प्रारंभ

### जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप यांची उपस्थिती

देशोन्नती वृत्तसंकलन



**दोंडाईचा** - शिंदखेडा तालुक्यातील दाऊळ येथे तापीमाई शेतकरी उत्पादक कंपनी व टु ब्रदर्स ऑर्गेनिक फार्म्स प्रा. लिमिटेड पुणे यांच्या सामंजस्य करार अंतर्गत गहू खरेदीचा प्रारंभ जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप यांच्या हस्ते करण्यात झाला.

शेतकऱ्यांनी नवनवीन पीक प्रयोग करून यशस्वी वाटचाल करावी, असा सल्ला श्री. जगताप यांनी दिला.

याप्रसंगी आत्मा संचालक हितेंद्र सोनवणे, समन्वयक स्मार्ट प्रकल्पाचे विनय बोरसे, तालुका कृषी अधिकारी देवेंद्र नागरे, केशरानंद उद्योग समूहाचे संचालक शिवराज भामरे, मंडळ अधिकारी अक्षय गंवादे, श्री. वाघ, कंपनीचे अध्यक्ष नरेंद्र भामरे, उपाध्यक्ष हितेंद्र गिरासे, संचालक जिजाबराव पाटील,प्रताप गिरासे, चेतन पाटील, गंगाराम पाटील उपस्थित होते. शेतकरी गोपाल भदाणे, सखाराम जाधव, प्रशांत पाटील, वसंत पाटील, गोपाळ जाधव, किशोर बिलाडे, हिम्मत गिरासे, दीपक अहिरे व शेतकरी सभासद उपस्थित होते.

Dhule Edition
Apr 08, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

# पुण्यनगरी

## तापीमाई उत्पादक शेतकरी कंपनीकडून गहू खरेदीस प्रारंभ

### जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप यांची उपस्थिती



**दोंडाईचा** : शिंदखेडा तालुक्यातील दाऊळ येथे तापीमाई शेतकरी उत्पादक कंपनी व टु ब्रदर्स ऑर्गेनिक फार्म्स प्रा. लिमिटेड पुणे यांच्या सामंजस्य करार अंतर्गत गहू खरेदीचा प्रारंभ जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप यांच्या हस्ते करण्यात झाला. शेतकऱ्यांनी नवनवीन पीक प्रयोग करून यशस्वी वाटचाल करावी, असा सल्ला श्री.जगताप यांनी दिला.

याप्रसंगी आत्मा संचालक हितेंद्र सोनवणे, समन्वयक स्मार्ट प्रकल्पाचे विनय बोरसे, तालुका कृषी अधिकारी देवेंद्र नागरे, केशरानंद उद्योग समूहाचे संचालक शिवराज भामरे, मंडळ अधिकारी अक्षय गंवादे, श्री.वाघ, कंपनीचे अध्यक्ष नरेंद्र भामरे, उपाध्यक्ष हितेंद्र गिरासे, संचालक जिजाबराव पाटील, प्रताप गिरासे, चेतन पाटील, गंगाराम पाटील उपस्थित होते. शेतकरी गोपाल भदाणे, सखाराम जाधव, प्रशांत पाटील, वसंत पाटील, गोपाळ जाधव, किशोर बिलाडे, हिम्मत गिरासे, दीपक अहिरे व शेतकरी सभासद उपस्थित होते.

Dhule Edition
Apr 07, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com